# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २०/०५/२०२६ (बुधवार )**

---

**पोलीस स्टेशन पारशिवनी येथील कंटेनर मधून लॅपटॉप चोरीच्या गुन्ह्यातील आंतरराज्यीय चोरास अटक करून एकूण ४६४ लॅपटॉप किं. ४ कोटी १९ लाखांचा मुद्देमाल केला हस्तगत (स्थानिक गुन्हे शाखा व पोलीस स्टेशन पारशिवनी ने राजस्थान पोलीसांसह मिळून केली संयुक्त कारवाई)**

**पोलीस स्टेशन पारशिवनी** :— दिनांक ०९/०५/२०२६ रोजी पोलीस स्टेशन पारशिवनी येथे फिर्यादि नामे प्रितम लालसिंग ढिल्लन वय ३८ वर्षे रा. बनीपूर, तह. बावल जि. रेवाडी, हरियाना यांच्या तक्रारीवरून अप.क्रं. २७९/२०२६ कलम ३१६(३), ३(५) भारतीय न्यास संहिता अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर प्रकरणातील फिर्यादि यांची ट्रान्सपोर्ट कंपनी असून त्यांचे कंपनीला ब्लू डार्ट कंपनीकडून लॅपटॉप ट्रान्सपोर्ट करण्याचा ऑर्डर मिळाला असता ब्लू डार्ट कंपनीने फिर्यादिचा कंटेनर क्रं. आर.जे. ३/जे.ई. १२१२ मध्ये एकूण ६४१ नग लॅपटॉप व टॅब्लेट किं. ५,७१,९६,६९९/— रू. आणि एलएडी डिफ्युजर सामान किं. ६०००/— असा एकूण ५,७२,०२,६९९/— रू. मुद्देमाल लोड करून गाडी चालक नामे अरशद सुबेदिन खान वय ४७ वर्षे रा. पिरूका तह. पाहरी जि. भरतपूर, राजस्थान आणि क्लिनर साजीद असलुफ खान वय ३० वर्षे रा. बालराका, तह. आलमशाह, जि. भरतपूर, राजस्थान यांना चेन्नई वरून गाडी सह सदर माल बिलासपूर ला पोच करण्यासाठी पाठविले असता यातील आरोपी क्रं. ०१) गाडी चालक नामे अरशद सुबेदिन खान वय ४७ वर्षे रा. पिरूका तह. पाहरी जि. भरतपूर, राजस्थान आणि आरोपी क्रं. २) क्लिनर साजीद असलुफ खान वय ३० वर्षे रा. बालराका, तह. आलमशाह, जि. भरतपूर, राजस्थान यांनी पो.स्टे. पारशिवनी हद्दीत आल्यानंतर खंडाळा, डुमरी गावातील, राष्ट्रीय महामार्ग क्रं. ४४ वरील आशु ढाब्या जवळ

गाडी उभी करून गाडीतील  कूण ६४१ नग लॅपटॉप व टॅब्लेट किं. ५,७१,९६,६९९/— रू. आणि एलएडी डिफ्युजर सामान किं. ६०००/— असा एकूण ५,७२,०२,६९९/— रू. मुद्देमाल चोरून नेल्याची फिर्यादि यांनी तक्रार दिल्याने नमूद आरोपीतांवर पो.स्टे. पारशिवनी येथे अप.क्रं. २७९/२०२६ कलम ३१६(३), ३(५) भारतीय न्यास संहिता अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हा दाखल होताच मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांनी तात्काळ आरोपींचा शोध घेवून आरोपी व चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत करण्याचे स्थानिक गुन्हे शाखा तसेच पो.स्टे. पारशिवनी यांना आदेशित करून तात्काळ स्थानिक गुन्हे शाखेचे तसेच पारशिवनी पोलीसांचे पथक तयार करून संयुक्तपणे आरोपींचा शोध घेण्यास रवाना केले असता सदर पथक तात्काळ आरोपीच्या राहते घरी राजस्थान येथे राजस्थान च्या स्थानिक पोलीसांसह गेले असता आरोपी क्रं. ०१) गाडी चालक नामे अरशद सुबेदिन खान वय ४७ वर्षे रा. पिरूका तह. पाहरी जि. भरतपूर, राजस्थान आणि आरोपी क्रं.  २) क्लिनर साजीद असलुफ खान वय ३० वर्षे रा. बालराका, तह. आलमशाह, जि. भरतपूर, राजस्थान हे घरी हजर मिळून आले नाही. करिता स्था.गु.शा. आणि पोलीस स्टेशन पारशिवनी च्या पथकाने राजस्थान आणि हरियाना राज्यातील नुह, मेवात आणि भरतपूर या भागात एका आठवड्यापासून कशोशिने तांत्रिक पुरावे, सिसीटीव्ही फुटेज आणि खबरी यांचे माध्यमाने आरोपींचा शोध घेत असता नमूद गुन्ह्यात वरील दोन्ही आरोपीतांसह **अजहरूद्दीन उर्फ हजरूद्दीन इद्रिस वय २८ वर्षे रा. खल्लूका तह. पहाडी जि. डीग, राजस्थान** हा सुध्दा गुन्ह्यात सामील असल्याचे समजल्याने सदर पथकाने स्थानिक पोलीसांसह सदर आरोपीस ताब्यात घेतले व त्याची अतिशय संयमाने व कसून चौकशी केली असता त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली, सदर आरोपीकडून गुन्ह्यातील चोरीस गेलेल्या मुद्देमालापैकी ४६४ नग लॅपटॉप किं. ४,१४,०२,९१५/— रू. तसेच गुन्ह्यात वापरलेली वाहन मारूती सुझुकी बलेनो कार क्रं. एच.आर.२७ एल. ४४९६ किं.अं. ५,००,०००/— असा एकूण ४,१९,०२,९१५/— रू. चा मुद्देमाल जप्त करूण आरोपीस गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्यात यातील आरोपीतांसह आणखी ७ आरोपी असे एकूण ९ आरोपी

असल्याचे निष्पन्न झाले असून इतर आरोपींचा शोध आणि गुन्ह्याचा पुढील तपास मा. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनात सुरू आहे. सदर आरोपींवर राजस्थान व इतर राज्यातही अनेक गंभीर गुन्हे असल्याचे त्यांचे गुन्हे अभिलेखावरून निष्पन्न झालेले असून ते आंरराज्यीय गुन्हे करण्यात सक्रीय असल्याचे निदर्शनास आले आहे. गुन्ह्यातील महत्वाचा आरोपी अटक झालेला असून इतर आरोपींचे मुसक्या आवळणे सुरू आहे.

सदर गुन्ह्याच्या तपासात मा. श्री. हर्ष ए. पोद्दार पोलीस, अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. रमेश बरकते व पोलीस निरीक्षक श्री.राजेशकुमार थोरात, ठाणेदार पो.स्टे. पारशिवनी व पोलीस निरीक्षक श्री. अंकुश माने, स्थानिक गुन्हे शाखा यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पथक आणि पो.स्टे. पारशिवनी चे पथक यांनी विशेष परिश्रम घेतले असून गुन्ह्याचा पुढील तपास मा. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनात सुरू आहे.



# नागपूर ग्रामीण पोलिसांनी संघटीतपणे गुन्हे करणाऱ्या आरोपीतांच्या टोळीविरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (MCOCA) अन्वये केली कारवाई

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांचे मार्गदर्शनात पो.स्टे. केळवद हद्दीत घरफोडी करून चोरी करणाऱ्या ०३ आरोपीतांच्या टोळीवर महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

**पोलीस स्टेशन केळवद** :— पोलीस स्टेशन पारशिवनी अंतर्गत फिर्यादी नामे फिर्यादी नामे स्वप्नील भाउसाहेब भालेराव, वय ४५ वर्षे रा.जरीपटका नागपूर यांनी दिनांक २०/०३/२०२६ रोजी पोलीस स्टेशन केळवद येथे येवून तोंडी रिपोर्ट दिली कि, दिनांक १८/०३/२०२६ चे १७/३० वा. ते दि. २०/०३/२०२६ चे ११/०० वा. दरम्यान कुणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीच्या **मौजा जैतपुर शिवारातील** भालेराव पशुधन व्यवसाय व दुग्धोत्पादन विद्यालय जैतपुर ता. सावनेर या संस्थेच्या तिन प्रशिक्षणाच्या वर्ग खोल्याचे दाराचे लॉक तोडून सदर संस्थेच्या संगणक कक्षातील १) एक जुना वापरता एल.जी.कंपनिचा ग्रे(राखडी) रंगाचा १६५ लिटरचा फ्रिज किमती ५०००/रू चा, २) एक जुना वापरता विना कंपनीचा असेंम्बल केलेला सि.पी.यु. किमती ३,०००/रू चा, ३) एक जुना वापरता सि.पी. प्लस कंपनीचा चार चानलवाला डिव्हीआर व त्याचा १८ इंचीचा मॉनीटर किमती ५०००/रू चा, ४) एक जुना वापरता ३२इंचीचा लोकल कंपनीचा ॲन्ड्राईड एल.सि.डी. टी.व्ही. किमती ३०००/रू चा, ५) चार जुन्या वापत्या ऑफीसर चेअर प्रत्येकी २०००/रू प्रमाणे ८०००/रू च्या ६) १० नग जुन्या वापरत्या लाल रंगाच्या प्लास्टीकच्या खुरच्या प्रत्येकी ५००/रू प्रमाणे ५०००/रू च्या, ७)एक जुनी वापरती बायोमॅट्रीक अटेन्डंन्स मशीन ५०००/—रू ची असा एकुण ३४,०००/—रू चा माल चोरून नेला अशा फिर्यादीचे तोंडी रिर्पोट वरून पो.स्टे. केळवद येथे अज्ञात आरोपीविरूध्द अप क्र. १२६/२६ क. ३३१(३),३३१(४),३०५ भा.न्या.सा. चा गुन्हा नोंद करून तपासात घेण्यात आला.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी सदर गुन्ह्यातील अज्ञात

आरोपीचा शोध घवून गुन्हा उघडकीस आणण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखा आणि पो.स्टे. केळवद पोलीसांना सक्रीय करत तात्काळ गुन्हा उघडकीस आणण्याचे आदेशित केले असता केळवद पोलीस तसेच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अज्ञात आरोपीचा शोध घेत असतांना घटनास्थळा जवळील प्राप्त सीसीटीव्ही फुटेज,तांत्रिक विश्लेशण तसेच गोपनिय मुखबीर कडून मिळालेल्या माहिती वरून रेकॉर्डावरील गुन्हेगार करणसिंग उर्फ करण भादा रा. पांढुर्णा मध्यप्रदेश हा त्याचे साथीदारासह सदर गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले वरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने आरोपी नामे **१)करणसिंग उर्फ करण जंगसिंग भादा, वय २५ वर्षे, रा. कबाडी मोहल्ला, शास्त्री वार्ड, पांढुर्णा, जि. पांढुर्णा (म.प्र.) , २) संगम जगदिशसिंग बावरी, वय ४० वर्षे, रा. कबाडी मोहल्ला, शास्त्री वार्ड, पांढुर्णा, जि. पांढुर्णा (म.प्र.) व ३) नितेश उर्फ नित्या रमेश गायकवाड, वय २९ वर्षे, रा. पंढरी वार्ड, बस स्टॉप जवळ पांढुर्णा जि. पांढुर्णा (म.प्र.)** यांना गुन्ह्यात तात्काळ अटक करून सदर गुन्हा उघडकीस आणला.

सदर आरोपींचे गुन्हे अभिलेख तपासून पाहिले असता आरोपी क्रं. **१)करणसिंग उर्फ करण जंगसिंग भादा, वय २५ वर्षे, रा. कबाडी मोहल्ला, शास्त्री वार्ड, पांढुर्णा, जि. पांढुर्णा (म.प्र.) , यांनी आरोपी क्र. २) संगम जगदिशसिंग बावरी, वय ४० वर्षे, रा. कबाडी मोहल्ला, शास्त्री वार्ड, पांढुर्णा, जि. पांढुर्णा (म.प्र.) व ३) नितेश उर्फ नित्या रमेश गायकवाड, वय २९ वर्षे, रा. पंढरी वार्ड, बस स्टॉप जवळ पांढुर्णा जि. पांढुर्णा (म.प्र.) व त्याव्यतिरीक्त इतर आरोपीतांची टोळी तयार करून स्वतः टोळीतील म्होरक्या म्हणून आणि इतर आरोपींना टोळीतील सदस्य म्हणून वापर करून** संघटीतरित्या/वैयक्तीकरित्या टोळी प्रमुख व टोळीतील सदस्यांचे आर्थिक फायदयासाठी तसेच परिसरात त्यांचे टोळीची दहशत व वर्चस्व पसरविण्यासाठी साथीदारांसह नागपूर ग्रामीण व इतर जिल्ह्यातही जबरी चोरी, घरफोडी व दरोडा करणे अशा प्रकारचे गंभीर स्वरूपाचे गुन्हे करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने व **सदर संघटीत गुन्हेगारीतील म्होरक्या १) करणसिंग उर्फ करण जंगसिंग भादा, वय २५ वर्षे, रा. कबाडी मोहल्ला, शास्त्री वार्ड, पांढुर्णा, जि. पांढुर्णा (म.प्र.)याने त्याचे टोळीतील सदस्य २) संगम जगदिशसिंग बावरी, वय ४० वर्षे, रा. कबाडी मोहल्ला, शास्त्री वार्ड, पांढुर्णा, जि. पांढुर्णा (म.प्र.) व ३) नितेश उर्फ नित्या रमेश गायकवाड, वय २९ वर्षे, रा. पंढरी वार्ड, बस स्टॉप जवळ पांढुर्णा जि. पांढुर्णा (म.प्र.) यांचे सह मिळून यापूर्वी**

**घरफोडी करून चोरी करणे व दरोडा घालण्याचे पोलीस स्टेशन केळवद येथे २ गुन्हे, पोलीस स्टेशन काटोल येथे २ आणि पोलीस स्टेशन बेनोडा जि. अमरावती येथे संघटीतपणे गुन्हे केल्याचे निष्पन्न झालेले** आहे तसेच सदर आरोपींनी इतर आरोपींच्या सोबत गंभीर स्वरूपाचे गुन्हे केल्याचे सुध्दा गुन्हे अभिलेखावर निष्पन्न झालेले आहे.

सदर आरोपीतांनी संघटीत गुन्हेगारी संघटनेचे सदस्य म्हणुन सतत जबरी चोरी व घरफोडी आणि दरोडा सारखे गुन्हे करुन सर्वसामान्य नागरीकांनी कष्टाने कमावलेल्या मालमत्तेची चोरी करुन नागरीकांना होणाऱ्या आर्थिक नुकसानीमुळे त्यांच्यामध्ये असुरक्षीततेची भावना तयार होवुन दहशत निर्माण झालेली आहे. टोळीने जबरी चोरी व घरफोडीसारख्या अवैद्य मार्गाचा वापर करुन आर्थीक लाभ मिळविण्यासाठी केलेले गंभीर स्वरुपाचे गुन्हेगारी कृत्य निदर्शनास येत असल्याने त्यांनी नुकतेच केलेले पोलीस स्टेशन केळवद येथील अप. क्रं. **१२६/२६ क. ३३१(३),३३१(४),३०५ भा.न्या.सं**. या गुन्ह्यात महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) लावणेबाबत पोलीस स्टेशन केळवद यांचेकडुन प्रस्ताव पोलीस अधिक्षक कार्यालय यांचेकडे प्राप्त झाल्यानंतर सदर प्रस्ताव मा. पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण यांनी मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परीक्षेत्र नागपूर यांचेकडे सादर केला असता मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परीक्षेत्र नागपूर यांनी दिनांक १८/०५/२०२६ रोजी सदर प्रस्तावास मंजुरी देवुन नमुद गुन्हयात **महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९ (MCOCA) चे कलम ३ (१) (ii), ३ (२), ३ (४) या कलमांचा अंतर्भाव करण्याबाबत आदेशित केल्याने सदर गुन्हयात** महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) लावण्यात आला असुन गुन्हयाचा पुढील तपास श्री. सागर खर्डे (भा.पो.से.), उपविभागीय पोलीस अधिकारी, सावने विभाग सावनेर यांचेकडे सुपुर्द करण्यात आला आहे.

# पोलीस ठाणे मौदा येथे परवान्यापेक्षा जास्त रेतीची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा नोंद (१० चक्का टिप्पर व रेती सह २५,३५,०००/— रू. मुद्देमाल जप्त पो.स्टे. मौदा ची कामगिरी )

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक १८/०५/२०२६ रोजी मौदा पोलीसांनी पेट्रोलींग दरम्यान अवैध रित्या रेतीची चोरटी वाहतूकीबाबत मिळालेल्या गुप्त बातमीच्या आधारे रेतीची वाहतूक करणारा १० चक्का टिप्पर ट्रक क्रं. **एम.एच. ३६ ए.ए. ०६८७** ला **मौजा माथनी टोल नाका** या ठिकाणी पंचासह थांबवून वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये निर्धारित क्षमतेपेक्षा जास्त रेतीची चोरटी वाहतूक करतांना मिळून आला.

**नमूद** ट्रक मध्ये ६ ब्रास रेती वाहून नेण्याची रॉयल्टी असता प्रत्यक्ष त्यामध्ये निर्धारित क्षमता/परवाण्यापेक्षा १ ब्रास अधिकची रेती अनधिकृतपणे चोरून नेतांना मिळून आल्याने पंचासमक्ष १० चक्का टिप्पर ट्रक क्रं. **एम.एच. ३६ ए.ए. ०६८७** किं.अं. २५,००,०००/— रू. आणि प्रती ब्रास ५०००/— रू. प्रमाणे ७ ब्रास रेती किं. ३५,०००/— रू. असा **एकूण २५,३५,०००/— रू. मुद्देमाल** जप्त करून सदर गुन्ह्यातील आरोपी **गाडी मालक नामे गणेश सेलोकर वय ३५ वर्ष रा.तिलक वार्ड, भंडारा व गाडी चालक नामे रोहित राजकुमार बांडेबुचे वय २५ वर्ष रा. वार्ड नं.४, महालगाव, ता. मोहाडी जि. भंडारा यांचे विरूध्द** पो.स्टे. मौदा येथे कलम ३०३(२), ३(५), ४९ भा.न्या.सं, सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसुल संहीता १९६६, सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधि. सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधि. १९८४ सहकलम ६१(१),२०७ मोटार वाहन कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द पो.स्टे. मौदा येथे कारवाई करून केला गुन्हा नोंद.

## ( एक आरोपी अटक, एकूण किं. ७,००,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त)

**पोलीस स्टेशन मौदा** :—दिनांक १९/०५/२०२६ रोजी पो.स्टे. मौदा येथील पोलीस स्टॉफ पेट्रोलींग करीत असतांना मौजा **कन्हान नदी उडान पुल** येथे महेंद्रा कंपनीची बोलेरो पिकअप वाहन क्रं **एम.एच.४९.डी १३२६** ही संशयास्पद स्थितीत दिसून आल्याने स्टॉफ च्या मदतीने सदर वाहनास थांबवून पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता वाहनाच्या डाल्यामध्ये १० गोवंश जनावरे अतिशय दाटीवाटीने त्यांच्या पायांना आखूड दोरखंडाने बांधून कोंबून घेवुन जात असतांना दिसून आल्याने सदर वाहन चालक नामे भुषण महादेव रामटेके वय २६ वर्षे रा. गोवरी ता. मौदा जि. नागपूर यास गोवंश जनावरे वाहून नेण्याच्या परवान्याबाबत विचारपूस केली असता त्याचे जवळ कोणतेही परवाना नसल्याचे सांगितले व वाहन चालकाने नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला पायाला आखुड दोरखंडाने निर्दयतेने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. **पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून एक** महेंद्रा कंपनीची बोलेरो पिकअप वाहन क्रं **एम.एच.४९.डी १३२६ किं.अं. ६,००,०००/— रू. आणि** १० गोवंश जनावरे किं.अं. १,००,०००/— रू असा **एकुण किं. ७,००,०००/— रू.** मुद्देमाल मोक्यावरून **जप्त केला. यातील आरोपी वाहन चालक/मालक आरोपी नामे भुषण महादेव रामटेके वय २६ वर्षे रा. गोवरी ता. मौदा जि. नागपूर** याच्या विरूध्द **पो.स्टे. मौदा येथे कलम ११(१), ११(१)(डी), ११(१)(इ), ११(१)(एफ) प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम सहकलम ५, ५(ए), ९ महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करून आरोपीस अटक करण्यात आली आहे व गोवंश जनावरांना गोसंरक्षण केंद्रामध्ये दाखल करण्यात आले आहे.**




## पोलीस स्टेशन मौदा येथे C.I.S.F. (NTPC) सी.आय.एस.एफ. व पोलीस ठाणे मौदा यांचे संयुक्त विद्यमाने घेण्यात आले अग्नीशमन जनजागृती कार्यशाळा

मा. श्री. हर्ष ए पोद्दार, पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांचे निर्देशान्वये पोलीस ठाणे मौदा येथे मौदा पोलीस आणि C.I.S.F. (NTPC) च्या संयुक्त विद्यमाने दि. २०/०५/२०२६ रोजी अग्नीशमन जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

**पोलीस स्टेशन मौदा** :— सध्या सुरू असलेल्या प्रखर उन्हाळ्यांच्या दिवसांमुळे जिल्ह्यात विविध ठिकाणी आणि विशेत: शेतशिवारामध्ये नैसर्गिक आगीचे तसेच नागरिकांच्या क्षुल्लक चुकांमुळे मानवी वस्ती, बाजारपेठ किंवा शेतशिवारामध्ये आग लागून मोठ्या प्रमाणात होणारी

जिवीत व वित्त हाणी टाळण्यासाठी प्रतिबंध व पूर्वतयारी म्हणून पोलीस स्टेशन मौदा च्या प्रांगणात NTPC मौदा येथे कार्यरत C.I.S.F. आणि पोलीस स्टेशन मौदा च्या संयुक्त विद्यमाने अग्नीशमन संबधाने जनजागृती पर कार्यशाळा घेण्यात आली.

सदर कार्यशाळेमध्ये मौदा शहर तसेच आजुबाजूच्या परिसरातील व गावातील लोकांना बोलावून उन्हाळ्याच्या दिवसात आग लागण्याचे कारण, आग लागू नये म्हणून घ्यावयाची काळजी आणि त्यावर प्रतिबंध कसे करावे याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच प्रत्यक्ष आग लागल्यावर करावयाची कृती तसेच फायर एक्सटींग्युशर चालविण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवून आग विझविण्याची कार्यवाही प्रत्यक्षात करून दाखविण्यात आली. त्याचप्रमाणे मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचे दि. ०४/०५/२०२६ रोजी निर्गमीत नागपूर ग्रामीण जिल्हा हद्दीत शेतातील पीक, अवशेष कडबा, भुसा किंवा कोणताही कचरा उघड्यावर जाळण्यापासून मनाई आदेशाची माहिती सुध्दा यावेळी देण्यात आली. सदर अग्नीशमन संबधाने घेण्यात आलेल्या कार्यशाळेस नागरिकांनी उत्फुर्स प्रतिसाद दिला असून कार्यशाळेत सांगण्यात आलेल्या संर्व बाबींची अंमलबजावणी करण्याची हमी सुध्दा दिली.






## पोलीस ठाणे रामटेक येथे परवान्यापेक्षा जास्त रेतीची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूध्द ५ गुन्हे नोंद
## ०५ वाहनासह ४४ ब्रास रेती असा एकुण १ कोटी ९२ लाख २० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त
## रामटेक पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन रामटेक** :— मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात दिनांक १८/०५/२०२६ रोजी रामटेक पोलीस आणि उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग, रामटेक श्री. रमेश बरकते यांनी पेट्रोलींग दरम्यान परवान्यापेक्षा जास्त रेती वाहतुक करून शासनाचा महसुल बुडवुण अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या वाहनांवर संयुक्तरित्या कारवाई करून ०५ वाहनांसह ४४ ब्रास रेती असा एकूण किंमती १ कोटी ९२ लक्ष २० हजार रू. चा मुद्देमाल जप्त करून एकुण ५ गुन्हे नोंद केले.

**दिनांक १८/०५/२०२६** रोजी पो.स्टे. रामटेक हद्दीतून वाहनामध्ये निर्धारित क्षमतेपेक्षा जास्त रेतीची वाहतूक करणाऱ्या वाहनांची मौजा **घोटीटोक चौक आणि बस स्टॅन्ड चौक रामटेक** येथे रामटेक पोलीस व उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग, रामटेक श्री. रमेश बरकते यांनी पेट्रोलींग दरम्यान रेती वाहून नेणाऱ्या संशयीत वाहनांना थांबवून वाहनांची पाहणी केली असता **१)** १२ चक्का टीप्पर क्रं एमएच २७ डीटी ७३०० वाहनामध्ये १० ब्रास रेती **२)** १२ चक्का टिप्पर एमएच ४० सीटी ७४५० मध्ये ९ ब्रास रेती, **३)** १२ चक्का टिप्पर क. एम.एचं. २७ डी.टी. ०९०७ मध्ये ७ ब्रास रेती, **४)** १२ चक्का टिप्पर क. एम. एच. ३६ ए.बी. १६६९ मध्ये ९ ब्रास रेती, **५)** १२ चक्का टिप्पर क्रं एम.एच.४० सी. एक्स. १६६९ मध्ये ०९ ब्रास रेती अशा प्रकारे विनापरवाना क्षमतेपेक्षा जास्त रेती मिळून आल्याने सर्व रेती वाहन चालक/मालक यांच्यावर कारवाई करण्यात आली.

**नमुद वाहन क्रं १ चा आरोपी** गाडी मालक नामे प्रशांत शामराव ठाकरे व गाडी चालक जगदीश सुंदरलाल कुसराम वय ५२ वर्षे दोन्ही रा. जरूड ता. वरूड जि. अमरावती, **वाहन क्रं २ चा** आरोपी गाडी मालक नामे शुभम मधुकर खोलगडे वय ३१ वर्षे रा. गोसेवाडी, पाटणसावंगी ता. सावनेर जि. नागपूर व गाडी चालक रविंद्र मंगरू वरखडे वय ४० वर्षे रा. घोगली आश्रम जवळ, कोराडी ता. कामठी जि. नागपूर, **वाहन क्रं ३ चा** आरोपी गाडी मालक हरिष यादवराव गोहाड रा. शनिवारी पेठ, वरूड जि. अमरावती व गाडी चालक अनिल अनंतराम कुंभरे वय ४० वर्षे रा. झटांग सिटी, ता. वरूड जि. अमरावती, **वाहन क्रं ४ चा** आरोपी गाडी मालक सुनिल हरगोविंद लंजे रा. साकोली जि. भंडारा व गाडी चालक गणेश झिबलजी अतकरे वय ३८ वर्षे रा. खडकी, ता. मोहाडी जि. भडारा, **वाहन क्रं ५ चा** आरोपी गाडी मालक सुनिल हरगोविंद लंजे रा. साकोली जि. भंडारा व गाडी चालक विवेक बंडू बोंदरे वय ३० वर्षे रा. खडकी पालोरा, ता. मोहाडी जि. भंडारा **यांच्या विरूध्द पोस्टे रामटेक येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं. अधिनियम सहकलम ४८(७), (८) महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम, सहकलम ४, २१ खाणी आणि खनिजे अधिनियम व सहकलम १५ पर्यावरण अधी सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंध अधिनियम, ६६(१), १९२(अ) १८४ मोटार वाहन कायदयान्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहे. वर नमुद ०९ आरोपींविरूध्द एकुण ५ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.**

**सदर कारवाईत वर नमुद ०५ वाहने आणि ४४ ब्रास रेती असा एकुण १ कोटी ९२ लाख २० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

## पोलीस ठाणे पाचगाव येथे परवान्यापेक्षा जास्त रेतीची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूध्द ३ गुन्हे नोंद ०३ वाहनासह २९.५ ब्रास रेती असा एकुण १ कोटी ११ लाख ४७,५००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त पाचगाव पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पाचगाव** :— मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात दिनांक १८/०५/२०२६ रोजी पाचगाव पोलीसांनी अवैध रेती चोरी बाबत मिळालेल्या गुप्त बातमीच्या आधारे नाकाबंदी करून परवान्यापेक्षा जास्त रेती वाहतुक करून शासनाचा महसुल बुडवुण अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करून ०३ वाहनांसह २९.५ ब्रास रेती असा एकूण किंमती १ कोटी ११ लक्ष ४७,५००/— रू. चा मुद्देमाल जप्त करून एकुण ३ गुन्हे नोंद केले.

**दिनांक १८/०५/२०२६** रोजी पो.स्टे. पाचगाव हद्दीतून वाहनामध्ये निर्धारित क्षमतेपेक्षा जास्त रेतीची वाहतूक करणाऱ्या वाहनांची मौजा **पाचगाव शिवार राजे ढाबा जवळ या ठिकाणी** पाचगाव पोलीसांनी नाकाबंदि करून अवैधपणे रेतीची चोरटी वाहतूक करणाऱ्या वाहनांना थांबवून वाहनांची पाहणी केली असता त्यामध्ये परवान्यानुसार निर्धारित क्षमतेपेक्षा अधिकची रेती अवैधपणे चोरून नेतांना मिळून आले. त्यामध्ये **१)** १२ चक्का टीप्पर क्रं एमएच ४९ सी. डब्लु २८०७ वाहनामध्ये ११.५ ब्रास रेती (परवान्यापेक्षा २.५ ब्रास अधिकची रेती) **२)** १२ चक्का टिप्पर एमएच एमएच ४९सी.एफ. २११२ मध्ये १०.५ ब्रास रेती (परवान्यापेक्षा १.५ ब्रास अधिकची रेती), **३)** १० चक्का टिप्पर क. एम.एचं. एमएच ४९ एटी ७२३५मध्ये ७.५ ब्रास रेती (परवान्यापेक्षा १.५ ब्रास अधिकची रेती), अशा प्रकारे परवान्यापेक्षा एकूण ५.५ ब्रास जास्त रेती अवैधपणे वाहतूक करतांना मिळून आल्याने सर्व रेती वाहन चालक/मालक यांच्यावर कारवाई करण्यात आली.

**नमुद वाहन क्रं १ चा आरोपी** गाडी मालक नामे मधुकर गणपतराव भाजीपाले वय ६६ वर्ष रा. साईबाबा नगर, खरबी, नागपूर व गाडी चालक अमजद कमल्लुद्दीन अन्सारी वय ४५ वर्ष वैशाली सायकल स्टोर्स जवळ, खरबी, नागपूर, **वाहन क्रं २ चा** आरोपी गाडी मालक नामे धिरज ढोबळे रा. हुडकेश्वर रोड, नागपूर व गाडी चालक धारा भावसिंग ईवनाते वय २८ वर्ष रा. साईबाबा नगर, खरबी, नागपूर, **वाहन क्रं ३ चा** आरोपी गाडी मालक शमीर बकराईद अंसारी व गाडी चालक फैज अजीज अंसारी वय २३ वर्षे दोन्ही रा. रोषनबाग, खरबी, नागपूर **यांच्या विरूध्द पोस्टे पाचगाव येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं. अधिनियम सहकलम ४८(७), (८) महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६, सहकलम ४, २१ खाणी आणि खनिजे (विकास आणि नियमन) अधिनियम १९५७, सहकलम १५ पर्यावरण अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंध अधिनियम १९८४, सहकलम ६६(१), २०७ मोटार वाहन कायदयान्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहे. वर नमुद ०६ आरोपींविरूध्द एकुण ३ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.**

**सदर कारवाईत वर नमुद ०३ वाहने आणि २९.५ ब्रास रेती असा एकुण १ कोटी ११ लाख ४७,५००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०५ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद (एकूण ०५ आरोपीतांविरूध्द ०५ गुन्हे नोंद)

दिनांक १८/०५/२०२६ व १९/०५/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्ह्यात अंमली पदार्थाचे सेवन करणारे आरोपीतांवर खालील प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

**पोलीस स्टेशन बुटीबोरी** :— पो.स्टे. बुटीबोरी अंतर्गत बुटीबोरी पोलीस पंचासह पेट्रोलींग करीत असतांना आरोपी नामे १) योगेश उदल कुहीकर वय १८ वर्ष रा.वार्ड नं. ४,सबाना किराणा दुकाना जवळ बुटीबोरी जि. नागपुर हा मौजा एमआयडीसी चौक बुटीबोरी पुलाजवळील सर्व्हिस रोडवर रित दालचा टपरीचे मागे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ गांजा चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. तसेच २) आरोपी नामे आदित्य अजय भगत वय १८ वर्ष रा. वार्ड नं. ४, बौदधविहार बाजार समिती बुटीबोरी जि. नागपुर हा

मौजा एमआयडीसी चौक बुटीबोरी पुलाखाली वर्धा कडे जाणा—या सर्व्हिस रोडवर बंद टपरीचे मागे सार्वजनीक ठिकाणी सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ गांजा चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. नमूद दोन्ही आरोपींकडून पंचासमक्ष अंमली पदार्थ गांजा सेवन करण्याचे साहित्य जप्त करून त्यांचेविरूध्द कलम २७ एन.डी.पी.एस. ॲक्ट प्रमाणे गुन्हे नोंद करण्यात आलेले आहेत.

**पोलीस स्टेशन नरखेड :—** पो.स्टे. नरखेड अंतर्गत नरखेड पोलीस पंचासह पेट्रोलींग करीत असतांना आरोपी नामे **महेन्द्र रायभान गजभिये वय ३३ वर्षे रा. सिंजर— मेंढला ता. नरखेड** हा **मौजा मोहदी दळवी रोड, ज्वालागीर बाबच्या मठाजवळ, मागच्या बाजुस** सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ गांजा चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. नमूद आरोपीकडून पंचासमक्ष अंमली पदार्थ गांजा सेवन करण्याचे साहित्य जप्त करून त्याचेविरूध्द कलम २७ एन.डी.पी.एस. ॲक्ट प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

**पोलीस स्टेशन देवलापार:—** पो.स्टे. देवलापार अंतर्गत देवलापार पोलीस पंचासह पेट्रोलींग करीत असतांना आरोपी नामे १) अनिल नागोराव भटपाई वय ३१ वर्ष रा. हिवराबाजारतह रामटेक नागपुर व २) अनिल मानिकराव मोहोड वय ५० वर्ष रा. जलालखेडा ता. नरखेड हे मौजा डोंगरताल शिवार येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ गांजा चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. नमूद दोन्ही आरोपींकडून पंचासमक्ष अंमली पदार्थ गांजा सेवन करण्याचे साहित्य जप्त करून त्यांचेविरूध्द कलम २७ एन.डी.पी.एस. ॲक्ट प्रमाणे गुन्हे नोंद करण्यात आलेले आहेत.

## जुगार खेळणाऱ्या आरोपींवर नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई (१६ आरोपीतांविरूध्द एकूण ०२ गुन्हे नोंद व ११,६५०/— रू. चा माल जप्त)

**पोलीस स्टेशन सावनेर :—** दिनांक १९/०५/२०२६ रोजी पो.स्टे. सावनेर पोलीसांना गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे ५२ ताशपत्त्यांचा जुगाराचा खेळ खेळणाऱ्या आरोपीतांवर **मौजा बोरगाव शिवार बोरगाव भट्टी कळमेश्वर** या ठिकाणी

पंचासमक्ष धाड टाकली असता आरोपी नामे **१) अखिलेश कमलसिंग परतेती वय ३५ वर्ष रा. शक्ती नगर, वाघोडा, तह. सावनेर**, **२) राजााराम भगवानदिन कश्यप वय ५४ रा. वाघोडा, तह. सावनेर , ३) रमेश कुमार देवालाल सरोज वय ४४ रा. वाघोडा तह. सावनेर** हे पैशाचा डाव लावून ५२ **ताशपत्त्यांचा जुगाराचा** खेळ खेळतांना प्रत्यक्ष मिळून आले. **आरोपींच्या ताब्यातून तसेच डावावरून नगदि १८००/— रू. आणि ५२ ताशपत्ते किं. १००/— असा एकूण १९००/— रू. मुद्देमाल जप्त** करण्यात आला असून आरोपींविरूध्द पो.स्टे. सावनेर येथे **कलम १२ महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.**

**पोलीस स्टेशन काटोल :—** दिनांक १८/०५/२०२६ रोजी पो.स्टे. काटोल पोलीसांना गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे ५२ ताशपत्त्यांचा जुगाराचा खेळ खेळणाऱ्या आरोपीतांवर **मौजा रेल्वे ट्रॅक च्या बाजूला, पंचवटी, काटोल** या ठिकाणी पंचासमक्ष धाड टाकली असता आरोपी नामे **१) तुषार राजेद्र चरडे वय २६ वर्ष रा. फिस्के लेआउट काटोल २) सुमित अण्णजी कडु वय ३४ वर्ष रा. गळपुरा काटोल ३) मनिष पंजाबराव क्षिरसागर वय २६ वर्ष रा. गळपुरा काटोल ४) यश बाबाराव राउत वय १८ वर्ष रा. गळपुरा काटोल ५)अनिश नरेश गुजवार वय २९ वर्ष रा.कारला ६) प्रशांत महादेव बागडे वय ३४ वर्ष रा. पंचवटी काटोल ७) अविनाश अरविंद ढोरे वय ३१ वर्ष रा. काळे चौक काटोल ८) अंकीत बंळवंत वाळके रा. काळे चौक काटोल ९)राहुल ठाकरे रा. काटोल १०)प्रविण बागडे रा. पंचवटी काटोल ११) सुरेश सोनवणे रा. साई मंदीर काटोल १२) रोशन वरघट रा. मरामाय नगर काटोल, १३) सिंकदर भोलाजी सोनवणे रा. काटोल** हे पैशाचा डाव लावून ५२ **ताशपत्त्यांचा जुगाराचा** खेळ खेळतांना प्रत्यक्ष मिळून आले. **आरोपींच्या ताब्यातून तसेच डावावरून नगदि ९७००/— रू. आणि ५२ ताशपत्ते किं. ५०/— असा एकूण ९७५०/— रू. मुद्देमाल जप्त** करण्यात आला असून आरोपींविरूध्द पो.स्टे. काटोल येथे **कलम १२ महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.**

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या १३ आरोपीतांविरूद्ध १२ गुन्हे नोंद

दिनांक १९/०५/२०२६ रोजी नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील विविध पोलीस अंतर्गत महाराष्ट्र दारूबंदी कायदा अन्वये पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण **५,६९,४००/—** रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण **१२** गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन अरोली** येथे अवैधरित्या देशी दारू जवळ बाळगून विक्री करणारा आरोपी नामे राजेश शामराव कापसे वय ४० वर्षे रा. विरशी ता. मौदा याचे विरूध्द १ गुन्ह नोंद व त्याचे जवळून रू. ५६०/— ची देशी दारू जप्त, **पोलीस स्टेशन वडोदा** येथे अवैधरित्या देशी दारू जवळ बाळगून विक्री करणारा आरोपी नामे विजय कोल्हु भिसने वय ५० वर्षे परसोडी ता. कामठी जि नागपुरयाचे विरूध्द १ गुन्ह नोंद व त्याचे जवळून रू. ५८०/— ची देशी दारू जप्त , **पोलीस स्टेशन खापा** येथे अवैध हातभट्टीची मोहफुलांची दारू काढून जवळ बाळगून विक्री करणारे आरोपी नामे १) प्रेमचंदबळीराम शेंडे वय ५५ वर्ष रा. कोथुरणा ता. सावनेर जि. नागपुर व २) मधुकर वरखडे वय ४० वर्ष रा. कोथुरणा ता. सावनेर जि. नागपुर यांचे विरूध्द प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद व एकूण १२००/— रू. ची हातभट्टीची मोहफुलांची दारू जप्त. **पोलीस स्टेशन कन्हान** येथे अवैधरित्या देशी दारू जवळ बाळगून विक्री करणारा आरोपी नामे दिनानाथ विश्वनाथ लोंढे वय ३६ वर्ष रा. विष्णुलक्ष्मी नगर, कन्हान ता. पारशिवनी याचे विरूध १ गुन्हा नोंद व त्याचे जवळून रू. १९२०/— ची देशी दारू जप्त. **पोलीस स्टेशन केळवद** येथे दारूचे सेवन करून धामधूम करणारा आरोपी नामे पंकज धनराज खंडाते, वय ३० वर्ष रा. नांदागोमुख याचे विरूध्द १ गुन्हा तसेच अवैधरित्या देशी दारू जवळ बाळगून विक्री करणारा आरोपी नामे श्याम देवाजी नारनवरे, वय ४५ वर्ष रा. ढालगाव खैरी ता. सावनेर याचे विरूध्द १ गुन्हा नोंद व त्याचे जवळून रू. ५६०/— ची देशी दारू जप्त. **पोलीस स्टेशन काटोल** येथे अवैधरित्या देशी दारू जवळ बाळगून विक्री करणारी **महिला आरोपी** विरूध १ गुन्हा नोंद व तीचे जवळून रू. ४८०/— ची देशी दारू जप्त., **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे अवैधरित्या

विदेशी दारू जवळ बाळगून अवैधरित्या वाहतूक करणारे आरोपी नामे १) पंकज मुरलीधर शेंडे वय ३४ वर्ष रा परसोडी ता काटोल व २) प्रणय राजेश निहारे वय २९ वर्ष रा पेठबुधवार काटोल यांचे विरूध १ गुन्हा नोंद व त्यांचे जवळून **रू. ६,३६०/— ची विदेशी दारू आणि चार चाकी बलेनो कार किं. ५,००,०००/— रू. असा एकूण किं. ५,०६,३६०/— रू. चा मुद्देमाल** जप्त तसेच अवैधरित्या देशी दारू जवळ बाळगून विक्री करणारा आरोपी नामे महादेव पुंजाराम केवट वय ५० वर्ष रा अडेगाव ता हिंगणा जि नागपुर याचे विरूध १ गुन्हा नोंद व त्याचे जवळून रू. २०१०/— ची देशी दारू जप्त असे एकूण २ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन कुही** येथे अवैधरित्या देशी दारू जवळ बाळगून अवैधरित्या वाहतूक करणारा आरोपी नामे साकीर सब्बीर शेख वय ५० वर्ष रा. वार्ड क्र १६ कुही ता कुही याचे विरूध १ गुन्हा नोंद व त्याचे जवळून **रू. ७,२००/— ची देशी दारू आणि दुचाकी एक्टीवा वाहन किं. ५०,०००/— रू. असा एकूण किं. ५७,२००/— रू. चा मुद्देमाल** जप्त. **पोलीस स्टेशन नरखेड** येथे सार्वजनिक ठिकाणी दारूचे सेवन करणारा आरोपी नामे दिनेश भिमराव कंळबे वय ४० वर्ष रा सावरगाव ता. नरखेड जि. नागपुर याचे विरूध्द १ गुन्हा नोंद.

**(नमुद कारवाईत एकुण १) १२ लिटर मोहाफुल गावठी दारू २) २६६४० मिली देशी/विदेशी दारू व इतर साहित्य असा एकुण ५,६९,४००/— रूपयांचा मुद्‌देमाल मिळून आला तसेच नाशवंत मुद्‌देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.)**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने